महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक १४७७(२)/२०२१/वीस दिनांक:- २४ मे, २०२३

# प्रसिध्दीपत्रक

**विषय** :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२१
तात्पुरती निवड यादी व भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत.
**संदर्भ** :- पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक १०६/२०११, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ व
मुख्य परीक्षा जाहिरात क्रमांक ३१/२०२२ दिनांक ३० मार्च, २०२२.

राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ या परीक्षेच्या पदनिहाय तात्पुरत्या निवड याद्या आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या असून त्याआधारे उमेदवारांकडून भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प मागविण्यात येत आहे.

२. प्रस्तुत परीक्षेची तात्पूर्ती निवड यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची आहे. उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करताना Opting Out मूळे काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवाराचा गुणवत्ता क्रम बदलू शकतो. तसेच शिफारशीचे पदही बदलू शकते.

३. प्रस्तुत तात्पूर्वी निवड यादी विविध मा. न्यायालयात / मा. न्यायधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरिता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITES या मेनूमध्ये 'Post Preference/Opting Out' वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक २५ मे, २०२३ रोजी १२.०० वाजेपासून दिनांक ३१ मे, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

**५. ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब /निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.**

६. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्पाआधारे अंतिम निकाल/ शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

७. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव, राजपत्रित परीक्षा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.